Tel:- 022 23073663
E mail ID –
dcpoffice.zone2@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२, मुंबई.
सर जे.जे.मार्ग,नागपाडा, मुंबई–४००००८

पुण्यश्लोक 300

जा.क्र.–१४२८/पोउआ/परि–२/वा./२६ दिनांक–३०/०३/२०२६

## जाहीरनामा

**(महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन–१९५१ चे कलम–८५ प्रमाणे)**

ज्याअर्थी, पोलीस उप–आयुक्त, परिमंडळ–२, मुंबई शहर यांच्या नियंत्रणाखालील **वि.प. मार्ग पोलीस ठाणे** हद्दीत पोलीस स्टेशन आवारात सध्या ०२ दुचाकी वाहने बेवारस स्थितीत आढळून आलेली आहेत. सदर वाहनांच्या मालकांचा शोध घेण्यासाठी पोलीसांकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले; तथापि, संबंधित वाहनमालकांचा कोणताही शोध लागलेला नाही किंवा कोणत्याही व्यक्तीने सदर वाहनांवर मालकी हक्काचा दावा केलेला नाही तसेच, वरील नमूद वाहने सुमारे १ वर्षापासून पोलीस ठाण्याच्या आवारात बेवारस स्थितीत पडून असल्याने ती गंज लागून निकृष्ट अवस्थेत गेली आहेत. त्यामुळे सदर वाहनांची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांचा जाहीर लिलाव करणे आवश्यक आहे, असे निदर्शनास आले आहे.

म्हणून मी, डॉ. **मोहित कुमार गर्ग, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ–२, मुंबई शहर, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन–१९५१ चे कलम–८५ प्रमाणे** नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून, वरील नमूद बेवारस वाहनांबाबत हा जाहीरनामा दिनांक–३०/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करीत आहे. सदर ०२ दुचाकी वाहनांची सविस्तर यादी या जाहीरनाम्यासोबत जोडण्यात आलेली आहे.

या जाहीरनाम्यात नमूद केलेल्या वाहनांवर कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, हितसंबंध, वारसाहक्क, तारणहक्क (Hypothecation), विमा दावा (Insurance Claim) किंवा इतर कोणताही हक्क असल्यास, संबंधितांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ६०(साठ) दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह संबंधित पोलीस ठाण्यात हजर राहून आपला दावा सादर करावा.

निर्धारित मुदतीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, संबंधित वाहनांवर कोणाचाही हक्क शिल्लक राहणार नाही, असे गृहीत धरून **महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन–१९५१ चे कलम–८७** नुसार जाहीर लिलावाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज **दिनांक–३०/०३/२०२६** रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ठिकाण– पोलीस उप–आयुक्त कार्यालय,**
**परिमंडळ–२, मुंबई**

३०/३/२६

**(डॉ. मोहित कुमार गर्ग)**
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ–२, मुंबई.

Scanned with CamScanner

वि.प.मार्ग पोलीस ठाणे मुबंई बेवारस दुचाकी वाहनाची माहिती.दिनांक ३०/३/२६

| अ. क्र | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | चेसिस नंबर | इंजिन नंबर |
|---|---|---|---|---|
| १) | HERO HONDA PASSION | NOT AVAILABLE | HME4JC588GGTOO162011 | NOT AVAILABLE |
| २) | HEROHONDA SPLENDOR | NOT AVAILABLE | Q7GDNFQ2792 | NOT AVAILABLE |

Scanned with CamScanner